**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ५**
**सभावृत्तांत**

दिनांक :- ९/९/२०१९ वेळ :- दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ९/०९/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
३. मा.नामदेव जनार्दन ढाके
४. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५. मा.सचिन बाजीराव चिंचवडे
६. मा.सुरेश शिवाजी भोईर
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
८. मा.राजेंद्र तानाजी गावडे
९. मा.निता विलास पाडाळे
१०. मा.उषा दिलीप काळे
११. मा.संतोष अंकुश कोकणे
१२. मा.विठ्ठल भोईर - नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

श्री.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, श्रीमती प्रभा गाडेकर – प्रशासन अधिकारी, श्री.प्रशांत पाटील - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, श्री.इ.बी.पाटील - कार्यकारी अभियंता,विद्युत,श्री.कुंडलिक दरवडे – सहा.आरोग्य अधिकारी, मा.आर.एम.इंगळे – उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, श्री.देवकते – कनिष्ठ अभियंता,विद्युत, श्री.मोने – कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, श्री.नरोटे – उपअभियंता, स्थापत्य, उद्यान, श्रीमती अमृता लागु – लेखाधिकारी इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष करुणाताई शेखर चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

**दिनांक ६/०८/२०१९ रोजीचा सभावृत्तांत क्र.४ कायम करणेत आला**.

ठराव क्र. ५ विषय क्र. १
दि. ९ /९/२०१९
सुचक : मा.नामदेव ढाके अनुमोदक: मा. संतोष कोकणे
संदर्भ :- मा. कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.बक्षेका/कावि/१२/१२३/२०१९ दि.२३/०८/२०१९ चे पत्र

मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.बक्षेका/कावि/१२/१२३/२०१९ दि.२३/०८/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मनपा विकास आराखडयातील डी.पी.रस्ते विकसीत करणेचे धोरण आहे. क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.१८ मधील कार्यक्षेत्रातील बहुतांश डी.पी.रस्ते विकसीत झालेले आहेत. परंतु अद्यापही प्रस्तावात नमुद केलेले विकास आराखडयातील रस्ते विकसीत करावयाचे बाकी आहेत.

| अ.क्र. | रस्ता रुंदी | रस्त्याचे ठिकाण | सर्व्हे नं. | लांबी (सुमारे) | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८ मी.रुंद | गुरुकुलम आश्रम ते केशवनगर काळेवाडी रस्ता व दर्शननगरी समोर मोरया क्रिडांगण कडुन काळेवाडीकडे जाणारा रस्ता | २९४,२९५,२९६ | ३५० मी व ८० मी | ६३०० चौ.मी. व १४४० चौ.मी |
| २ | १८ मी.रुंद | यशोपुरम पुल ते काळेवाडी पुल रस्ता साखळी १३२० ते १४२० | २९२ | १०० मी | १८०० चौ.मी |
| ३ | १२ मी.रुंद | पांढरीचा मळा टॉयलेट ब्लॉक ते साईसाठे पार्क | २९५,२९६,२९७ | १२० मी | १४४० चौ.मी |

तरी नमुद विकास आराखडयातील रस्ते विकसीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरच्या रस्त्यांच्या जागा मनपाच्या ताब्यात घेवुन रस्ते विकसीत करावे लागणार आहेत. सदरची जागा प्रपत्र अ व ब व्दारे आगाऊ ताब्यात येत नसल्याने भुसंपादनाव्दारे ताब्यात घ्यावी लागणार आहे. सबब उपरोक्त नमुद विकास आराखडयातील रस्त्यांच्या जागा भुसंपादनाने ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. ६ विषय क्र. २

दि. ९ /९/२०१९

सुचक : मा. प्रज्ञा खानोलकर अनुमोदक: मा. माधुरी कुलकर्णी

संदर्भ :- मा.प्रज्ञा खानोलकर यांचे दिनांक ०२/०८/२०१९ चे पत्रानुसार

मा.प्रज्ञा खानोलकर यांचे दिनांक ०२/०८/२०१९ चे पत्रानुसार, किवळे विकासनगर येथील दत्तनगर (एकता कॉलनी) मधील किवळे स.नं.७०/१ येथील सेंट जोसेफ शाळा ते भिमाशंकर कॉलनी क्र.२ पर्यंतचा अंतर्गत रस्ता कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

## सभा कामकाजात ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

ठराव क्र. ७ विषय क्र. ३

दि. ९ /९/२०१९

सुचक : मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक: मा. सुरेश भोईर

संदर्भ :- मा.सचिन चिंचवडे यांचे दिनांक ९/०९/२०१९ चे पत्रानुसार

मा.सचिन चिंचवडे यांचे दिनांक ९/०९/२०१९ चे पत्रानुसार चिंचवड गावातील मोरया यात्री निवासा समोरील चौकास कै.पै.नंदु तात्या लांडगे चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. ८ विषय क्र. ४

दि. ९ /९/२०१९

सुचक : मा. सुरेश भोईर अनुमोदक: मा. अश्विनी चिंचवडे

संदर्भ :- मा.सुरेश भोईर यांचे दिनांक ५/०९/२०१९ चे पत्रानुसार

मा. सुरेश भोईर यांचे दिनांक ५/०९/२०१९ चे पत्रानुसार, चिंचवडगाव येथील जेष्ठ नागरिकांच्या मागणीनुसार, चिंचवड नगरीतील प्रसिध्द असलेले प्राचीन श्री.हनुमान मंदिर आहे. त्या मंदिरा समोरील असणा-या चौकास श्री.हनुमान चावडी चौक असे नामकरण करावे असे तेथील रहिवाशी व नागरिकांची मागणी आहे, तरी मंदिरासमोरील चौकास श्री.हनुमान चावडी चौक असे नामकरण करण्यास मान्यता

देण्यात येत आहे.  सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा  ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. ९ विषय क्र. ५

दि. ९ /९/२०१९

सुचक :  मा. सुरेश भोईर अनुमोदक: मा. अश्विनी चिंचवडे

संदर्भ :- मा.सुरेश भोईर यांचे दिनांक ५/०९/२०१९ चे पत्रानुसार

मा. सुरेश भोईर यांचे दिनांक ५/०९/२०१९ चे पत्रानुसार, श्रीमान महासाधु श्री.मोरया गोसावी हे साक्षात गणेशाचे अवतार होते, व त्यांच्या पुढील सात पिढयांमध्ये श्री.गणेश अंशरुपाने होते.  श्री मोरया गोसावी यांचे नातु श्री नारायण महाराज व श्री काका महाराज हे देखील महान गाणपत्य होते त्यांनी अनेक दैवी चमत्कार केले, भविष्यात चिंचवड परिसर नावलौकिकास येईल असे भाष्य श्री नारायण महाराज यांनी त्यावेळी केले होते.  श्री काका महाराज यांना खडतर तपश्चर्याने थेऊर येथे श्री मंगलमुर्ती प्राप्ती झाली.
म्हणुन चिंचवड देवस्थान ट्रस्ट व देव परिवाराच्या मागणीनुसार श्री.मोरया गोसावी मंदिर अष्टविनायक कमान मार्गास श्री विनायक ऊर्फ काका महाराज (देव) मार्ग तसेच प्रितम व शिवतीर्थ अपार्टमेंटच्या चौकास श्री.नारायण महाराज (देव) चौक असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा  ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. १० विषय क्र. ६

दि. ९ /९/२०१९

सुचक :  मा. निता पाडाळे अनुमोदक: मा. सुरेश भोईर

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे पत्रानुसार

मा.निता पाडाळे यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२२,विजयनगर काळेवाडी येथे निर्मल बेंथनी हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज असुन सदर शाळेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर शाळा आत मध्ये असुन पालकांना शोधणेसाठी गैरसोय होत असते.  म्हणुन मेन रोड काळेवाडी सेवा विकास बँक काळेवाडी शाखेच्या समोरील ठिकाणी मेन रोड काळेवाडी ते निर्मल बेंथनी रोड हा फलक लावल्यास पालकांची मोठी गैरसोय दुर होईल तरी असे नाव देण्याकामीचे प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा  ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. करुणाताई शेखर चिचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणाताई शेखर चिंचवडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/११/२०१९.
दिनांक : ३०/०९/२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना